**MHAH160016922022**

## <u>निशाणी क.१६ खालील आदेश</u>

१. अर्जदाराने मुळ अर्ज गैरअर्जदाराविरूध्द महिलांचे घरगुती हिसाचारापासुन संरक्षण कायदा कलम १२ नुसार दाखल केला असून गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज नि. १६ न्यायप्रविष्ठ करून कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जाकामी आवश्यक ते कागदपत्रे मिळण्यास उशिर झाल्याने ते कैफियत देवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरूध्द 'विनाम्हणणे' आदेश पारीत करण्यात आलेला आहे. गैरअर्जदार हे प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे देण्यास इच्छुक आहेत. सबब त्यांच्याविरूध्द झालेला विनाम्हणणे आदेश बाजूला सारण्यात यावा अशी विनंती गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे.

२. अर्जाकामी अर्जदाराने दिलेले म्हणणे पाहिले. अर्जदाराचे म्हणणे नुसार अर्ज खोटा आणि बनावट स्वरूपाचा आहे. केवळ वेळकाढुपणा करण्याकरिता आणि अर्जाचे कामकाज लांबणीवर टाकण्याकरिता गैरअर्जदार वेळेत उपस्थित झाले नाहीत. सबब अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास गैरअर्जदारावर जबर खर्चाची लावावी अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. अर्ज पाहिला. मुळ अर्ज महिलांचे घरगुती हिसाचारापासुन संरक्षण कायदा कलम १२ नुसार दाखल आहे. प्रस्तुत अर्जाची गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. थोडक्यात, नैसर्गीक न्यायतत्वानुसार गैरअर्जदार यांचे कैफियत येण्यास झालेला उशिर माफ करणे आणि त्यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. मात्र कैफियत देण्याकामी झालेला निष्काळजीपणा

पाहता योग्य ती खर्चाची रक्कम गैरअर्जदारावर बसविणेही तितकेच महत्वाचे आहे. परिणमी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

गैरअर्जदार यांनी पुढील तारखेस अथवा त्यापुर्वी अर्जदार यांना खर्चाची रक्कम रूपये २००/— देण्याच्या अटीवर प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांच्याविरूध्द झालेला विनाकैफियत आदेश बाजूला सारण्यात येतो.

RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2022.12.05 17:04:39 +0530

दिनांक : ०५.१२.२०२२.
ठिकाण—अकोले.

( आर.के. गायकवाड )
न्यायदंडाधिकारी वर्ग —१, अकोले.